

दैनिक आकर्षण

संपादक : विजय सांगळे

वर्ष ६ ▪ अंक ४८ ▪ मंगळवार १७ नोव्हेंबर २०२६ ▪ पाने ४ मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322



भिंगार बनले बिंगोचे माहेरघर

तरुण पिढी भरकटतेय, एसपींच्या ॲक्शनकडे नागरिकांचे लक्ष

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– नगर शहरातील तोफखाना व कोतवाली या दोन प्रमुख पोलीस ठाण्यांच्या हद्दीत अवैध धंद्यांवर कडक कारवाई करत बिंगो जुगार सध्या पूर्णपणे बंद करण्यात पोलिसांना यश आले आहे. मात्र, याच शहरालगत असलेल्या भिंगार परिसरात अवैध बिंगो जुगाराचा मोठा सुळसुळाट झाला आहे. सहायक पोलीस निरीक्षक (एपीआय) जयश्री थोरात यांच्या अखत्यारीतील भिंगार परिसरात या वाढत्या अवैध धंद्यांमुळे नगर शहर परिसरातील तरुण पिढी बिंगोच्या गर्तेत भरकटत चाललीआहे. शहर हद्दीतील या बिंगोंवर कारवाईसाठी पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनीच स्वतः या प्रकरणी लक्ष घालून भिंगारमधील बिंगोंचा कायमचा बंदोबस्त करावा, अशी जोरदार मागणी नागरिकांमधून होत आहे. सध्या भिंगार परिसरातील अनेक भागात बिंगोचे अड्डे खुलेआम सुरू आहेत. विशेषतः भिंगारमधील बाजार तळ, बाजार मार्केट, वडारवाडी, पाण्याची टाकी झोपडपट्टी आणि इंदिरानगर या ▪ पान ४ वर



एसपींच्या ॲक्शनकडे नागरिकांचे लक्ष

एकीकडे शहरात अवैध धंद्यांवर मोठी कारवाई सुरू असताना, भिंगारमधील बाजार तळ, वडारवाडी, इंदिरानगर सारख्या गजबजलेल्या आणि झोपडपट्टी भागात बिंगो राजरोसपणे कसा चालतो? हा खरा प्रश्न आहे. स्थानिक पोलिसांच्या आशीर्वादाशिवाय हे अड्डे चालणे शक्य नाही, अशी चर्चा नागरिकांमध्ये सुरू असून आता थेट एसपींच्या ॲक्शनकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

तरुण पिढीच्या भवितव्यावर प्रश्नचिन्ह

राजरोस चालणाऱ्या या अवैध बिंगो अड्ड्यांमुळे परिसरातील शांतता धोक्यात आली असून, अनेक गंभीर सामाजिक प्रश्न निर्माण झाले आहेत. यामुळे संपूर्ण तरुण पिढीच्या भवितव्यावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. तोफखाना व कोतवाली पोलीस ठाण्याच्या हद्दीत बिंगोवर कारवाई होऊन ते बंद असल्याने, व्यसनाच्या आहारी गेलेल्या अनेक तरुणांनी आता भिंगारकडे आपला मोर्चा वळवला आहे. शहराजवळील या वाढत्या बिंगो अड्ड्यांमुळे भिंगारमधील परिस्थिती चिंताजनक बनली आहे. राजरोसपणे सुरू असलेल्या या बिंगोमुळे संपूर्ण तरुण पिढी उद्ध्वस्त होण्याचा धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे भिंगार परिसरातील हे बिंगो अड्डे तातडीने आणि कायमस्वरूपी बंद करण्यासाठी स्वतः जिल्हा पोलीस अधीक्षकांनी या प्रकरणात जातीने लक्ष घालावे व कठोर कारवाई करावी, अशी तीव्र मागणी त्रस्त पालक वर्गाकडून केली जात आहे.

पालक वर्गाला होतोय मनस्ताप

भिंगारमध्ये राजरोस चालणाऱ्या बिंगोचे तरुण पिढीवर दुष्परिणाम होत आहेत. बिंगोच्या आहारी गेल्याने अनेक तरुण मोठ्या प्रमाणावर कर्जबाजारी झाले आहेत. झटपट पैसे कमावण्याच्या नादात त्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत असून, अनेकजण नैराश्यात जात आहेत. मुलांच्या या व्यसनामुळे आणि वाढत्या कर्जामुळे घराघरांत वाद-विवाद वाढत चालले आहेत. या परिस्थितीचा सर्वाधिक मानसिक आणि आर्थिक फटका पालकांना बसत आहे. जुगार खेळण्यासाठी पैसे उपलब्ध न झाल्यास किंवा कर्जाचा डोंगर वाढल्यास तरुण चोरी, फसवणूक यांसारख्या गुन्हेगारी मार्गाकडे वळण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे.

राज्यातील ३४ हजार न्यायालयीन कर्मचारी संपावर; न्यायालयीन कामकाज ठप्प!

। उच्च न्यायालयाप्रमाणे सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याची मागणी; २१ महिन्यांपासून प्रस्ताव शासनदरबारी प्रलंबित । अहिल्यानगर जिल्ह्यातील १३०० कर्मचारी संपात सहभागी; जिल्हा न्यायालयात शांततेत निदर्शने



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– समान काम, समान वेतन या तत्त्वानुसार उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांप्रमाणेच दुय्यम न्यायालयातील कर्मचाऱ्यांनाही सुधारित वेतनश्रेणी लागू करावी, या प्रमुख मागणीसाठी महाराष्ट्रातील सुमारे ३४ हजार न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी बेमुदत संप पुकारला आहे. या संपात अहिल्यानगर जिल्ह्यातील सुमारे १३०० न्यायालयीन कर्मचारी सहभागी झाले असून, जिल्हा न्यायालयातील कर्मचाऱ्यांनी शांततेत निदर्शने करून आपल्या मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधले. महाराष्ट्र राज्य न्यायालयीन कर्मचारी महासंघाच्या नेतृत्वाखाली राज्यभर हे आंदोलन सुरू करण्यात आले आहे.

न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या सुधारित वेतनश्रेणीचा प्रस्ताव उच्च न्यायालयाच्या समितीने मंजूर करून महाराष्ट्र शासनाकडे पाठविला आहे. मात्र, या प्रस्तावाला तब्बल २१ महिने उलटूनही शासनाकडून अद्याप अंतिम निर्णय घेण्यात आलेला नाही. ३१ जानेवारी २०२५ पासून या मागणीसाठी सातत्याने पाठपुरावा सुरू असूनही शासनाने या प्रश्नाची गांभीर्याने दखल घेतली नसल्याचा आरोप कर्मचारी महासंघाने केला आहे. ▪ पान ४ वर

संगमनेरमध्ये अवैध कत्तलखान्यावर छाप्यात चौदाशे किलो गोमांस जप्त

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने संगमनेर येथील एका अवैध कत्तलखान्यावर छापा टाकून तब्बल १४०० किलो गोमांसासह एकूण ४ लाख २२ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

मंगळवारी (दि. १७) स्थानिक गुन्हे शाखेचे पथक संगमनेर शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत गस्त घालत असताना गोपनीय माहिती मिळाली की, जमजम कॉलनीतील गल्ली नं. १० येथे फैजान अक्तार शेख याच्या घराशेजारी असलेल्या निळ्या रंगाच्या पत्र्याच्या शेडमध्ये गोवंशीय जनावरांची बेकायदेशीररित्या कत्तल केली जात ▪ पान ४ वर



कारवाई करणारे पथक

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली व स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या सूचनेनुसार ही कारवाई करण्यात आली. या तपास पथकात पोलीस उपनिरीक्षक कृष्णकुमार सेदवाड यांच्यासह पोलीस अंमलदार अतुल लोटके, गणेश लबडे, प्रकाश मांडगे, अमोल आजबे आणि संभाजी कोतकर यांचा समावेश होता.

महापालिकेच्या न्यायालयीन विभागाचे काम म्हणजे 'आंधळं दळतंय अन् कुत्रं पीठ खातंय'; सभापती लोंढेंचा संताप!

पुतळा उभारणी आणि प्रारूप विकास आराखड्याला न्यायालयाची स्थगिती; न्यायालयीन विभागाच्या कामकाजाचा अहवाल मागविला

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर–शहराच्या विकासकामांमध्ये होत असलेली दिरंगाई, अधिकाऱ्यांची अनुपस्थिती, न्यायालयीन प्रकरणांमधील महापालिकेची ढिसाळ भूमिका, पाणीपुरवठ्यातील अनियमितता आणि वाढत्या चोऱ्यांसह विविध प्रश्नांवर अहिल्यानगर महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभेत नगरसेवकांनी प्रशासनाला धारेवर धरले. माळीवाडा येथे महात्मा ज्योतिबा फुले व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचा पुतळा उभारणीच्या कामाला तसेच महापालिकेच्या प्रारूप विकास आराखड्याला उच्च न्यायालयाने स्थगिती दिल्याच्या मुद्द्यावरून सभेत जोरदार चर्चा झाली. 'महापालिकेचा न्यायालयीन विभाग नेमके काय काम करतो? वकिलांवर लाखो रुपये खर्च करूनही न्यायालयात महापालिकेची बाजू सक्षमपणे मांडली जात नसेल तर त्याचा उपयोग काय?' असा सवाल नगरसेवक निखिल वारे यांनी उपस्थित केला. यावर सभापती पै. सुभाष लोंढे यांनी तीव्र नाराजी व्यक्त करत न्यायालयीन ▪ पान ४ वर



फुले दाम्पत्यांच्या स्मारकासाठी माळीवाडा वेशीवर पेटले आंदोलन; प्रशासनाच्या लेखी आश्वासनानंतर उपोषण स्थगित!

भूमिपूजनाला १५ महिने उलटले, तरी पुतळ्यांचे काम रखडलेच! कृती समिती व माळी समाजाच्या आमरण उपोषणाने महापालिका प्रशासनाला जाग । दीड महिन्याचा अल्टिमेटम! अन्यथा पुन्हा तीव्र आंदोलन



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– माळीवाडा वेस येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि महात्मा ज्योतिराव फुले यांच्या भव्य पूर्णाकृती पुतळ्यांची उभारणी करण्यासाठी भूमिपूजन होऊन तब्बल एक वर्ष तीन महिने उलटले, तरी प्रत्यक्ष कामाला अद्याप सुरुवात झालेली नाही. महापालिका प्रशासनाच्या या दिरंगाईविरोधात अखेर फुलेप्रेमी आणि माळी समाजातील विविध संघटना आक्रमक झाल्या आहेत. पुतळे उभारणीच्या कामाला तातडीने सुरुवात करावी आणि माळीवाडा वेस परिसरातील बेकायदेशीर अतिक्रमणे हटवावीत, या प्रमुख मागण्यांसाठी सोमवारी (दि. १६ नोव्हेंबर) क्रांतीज्योती सावित्रीबाई महात्मा ज्योतिबा फुले कृती समिती आणि अहिल्यानगर सकल माळी समाज संस्थेच्या वतीने माळीवाडा वेशीवरील महात्मा फुले यांच्या पुतळ्यासमोर बेमुदत आमरण उपोषण सुरू करण्यात आले. दरम्यान, महापालिकेचे उपायुक्त हरीनारायण येलगट्टे आणि अतिक्रमण विभागाचे प्रमुख सुरेश इथापे यांनी लेखी आश्वासन दिल्यानंतर उपोषण स्थगित करण्यात आले. मात्र, दीड महिन्याच्या आत स्मारक उभारणीबाबत ठोस कार्यवाही सुरू न झाल्यास पुन्हा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा यावेळी देण्यात आला.

उपायुक्त हरीनारायण येलगट्टे आणि अतिक्रमण विभागाचे प्रमुख सुरेश इथापे यांनी उपोषणस्थळी भेट देऊन आंदोलनकर्त्यांशी चर्चा केली. फुले दाम्पत्यांच्या स्मारक उभारणीसाठी आवश्यक कायदेशीर प्रक्रिया लवकर पूर्ण करण्यात येईल. तसेच स्मारकाच्या जागेतील अतिक्रमणांचे स्थलांतर करून ते निष्कासित करण्याबाबत कार्यवाही केली जाईल, असे लेखी आश्वासन त्यांनी दिले. प्रशासनाकडून मिळालेल्या या आश्वासनानंतर उपोषणकर्त्यांना ज्यूस पाजून उपोषण स्थगित करण्यात आले. मात्र, दिलेल्या मुदतीत प्रत्यक्ष कार्यवाही झाली नाही, तर यापेक्षा अधिक तीव्र आंदोलन उभारले जाईल, असा इशाराही कृती समिती आणि सकल माळी समाजाच्या पदाधिकाऱ्यांनी दिला.

यावेळी कृती समितीचे अध्यक्ष प्रा. माणिक विधाते, सकल माळी समाज संस्थेचे अध्यक्ष किशोर डागवाले, कृती समितीचे सचिव अशोक कानडे, पंडितराव खरपुडे, ज्ञानेश्वर रासकर, बजरंग भुतारे, माजी उपमहापौर अनिल बोरुडे, अमोल गाडे, नगरसेवक दत्ता गाडळकर, सुरेश बनसोडे, गोरख पडोळे, नगरसेविका आशाताई डागवाले, नगरसेविका सुनिताताई फुलसौंदर, सुजाता पडोळे, सकल माळी समाजाचे सचिव अमोल भांबरकर, अनिल इवळे, दिपक खेडकर, मळू गाडळकर, राहुल रासकर, ▪ पान ४ वर



दै. आकर्षण निवडक

नगरमध्ये गुरुवारी मोफत हृदयरोग तपासणी शिबीर

अहिल्यानगर- पुण्यातील रूबी हॉल क्लिनिक येथे हृदयरोगावरील अत्याधुनिक व जागतिक दर्जाच्या उपचार सुविधा उपलब्ध आहेत. राज्यातील रूग्णांना या सुविधांचा लाभ होत असतो. याशिवाय जास्तीत जास्त रूग्णांना या सेवेचा लाभ मिळण्यासाठी गुरुवार दि. १९ नोव्हेंबर २०२६ रोजी मोफत हृदयरोग तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. नगर शहरात तारकपूर येथील साई एशियन हॉस्पिटलमध्ये दुपारी २.३० ते ३.३० यावेळेत तपासणी शिबिर होईल. या शिबिरात ग्रँट मेडिकल फौंडेशन, रुबी हॉल क्लिनिक, पुणे येथील हृदयरोग तज्ज्ञ रूग्णांची तपासणी व मार्गदर्शन करणार आहेत, अशी माहिती सिनियर मॅनेजर संतोष दसासे यांनी दिली. नगरमध्ये दर महिन्याला तिसऱ्या गुरूवारी कार्डियाक ओपीडी सेवा दिली जाते. सध्याच्या काळात हृदयविकारावर अधिक परिणामकारक उपचार शक्य झाले असून याठिकाणी प्रसिध्द हृदयरोगतज्ज्ञ डॉक्टर रूग्ण तपासणी व उपचारांसाठी उपलब्ध असतात. छातीत दुखणे, दम लागणे, अस्वस्थ वाटणे अशी लक्षणे असलेल्या रूग्णांनी या शिबिरात आवर्जून तपासणी करून घ्यावी. शिबिरासाठी ०२४१-२३२५६४८ या क्रमांकावर नाव नोंदणी करावी असे आवाहन करण्यात आले आहे.

कर्जत तालुका खरेदी विक्री सहकारी संघाची निवडणूक बिनविरोध



अहिल्यानगर- कर्जत तालुका खरेदी विक्री सहकारी संघ मर्या., कर्जतच्या चेअरमनपदी श्री. ज्ञानदेव लक्ष्मण गांगर्डे (रा. कोंभळी) यांची बिनविरोध निवड झाली. माजी चेअरमन श्री. प्रकाश चेडे यांनी ठरलेल्या कालावधीत राजीनामा दिल्यानंतर रिक्त झालेल्या चेअरमनपदासाठी ही निवड प्रक्रिया पार पडली. मा. प्रा. राम शिंदे साहेबांनी मागील ३ वर्षांपूर्वी या संघाची सार्वत्रिक निवडणूक बिनविरोध करून संस्थेला उर्जितावस्था देण्यासाठी प्रयत्न केले. आजही त्यांच्याच मार्गदर्शनाखाली व सूचनेनुसार सर्व संचालकांनी एकमताने, संमती दर्शवून ही निवड बिनविरोध केली. निवडणूक कामकाज सहाय्यक निबंधक कार्यालयातील श्री. टेकाळे साहेब यांनी पाहिले. श्री. ज्ञानदेव गांगर्डे यांच्या नावावर सर्वसंमती होऊन एकमेव अर्ज आल्याने त्यांची निवड जाहीर करण्यात आली. यावेळी श्री. प्रकाश चेडे, श्री. सर्जेराव बावडकर, श्री. ज्ञानदेव गांगर्डे, श्री. सुखदेव मुळीक, श्री. रामदास सूर्यवंशी, श्री. राजेंद्र त्र्यंबके, श्री. सतिष सुद्रिक, श्री. मच्छिंद्र कोल्हे, श्री. तुकाराम जवणे, श्री. राजेंद्र निकत, श्री. अण्णासाहेब महारनवर, सौ. वैशाली चंद्रशेखर खरमरे, सौ. आशाताई बनकर असे सर्व संचालक मंडळ उपस्थित होते. या निवडीनंतर मा. प्रा. राम शिंदे साहेब, पालकमंत्री मा. श्री. राधाकृष्ण विखे पाटील, अ. नगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक संचालिका सौ. ज्योती प्रकाश शिंदे यांनी या निवडीचे स्वागत करून श्री. गांगर्डे यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.



बुद्धिबळाच्या पटावर मानवी बुद्धिमत्ता विरुद्ध कृत्रिम बुद्धिमत्ता!

शांतीकुमारजी फिरोदिया अखिल भारतीय खुल्या आंतरराष्ट्रीय मानांकन बुद्धिबळ स्पर्धेत चीनमधून आणलेल्या अत्याधुनिक बुद्धिबळ खेळणाऱ्या रोबोटसोबत डावपेच आखताना खेळाडू.

श्राद्धकर्मात श्रद्धा महत्त्वाची; सद्विचारांची पिढी घडविण्यात माता-पित्यांची भूमिका अनमोल – ह.भ.प. उद्धव महाराज मंडलिक

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



शेवगाव– शेवगाव येथील उपप्राचार्य कल्याण रुईकर सर यांच्या मातोश्री द्रोपदाबाई देवराव रुईकर यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त आयोजित कीर्तन सेवेत ह.भ.प. महंत उद्धव महाराज मंडलिक यांनी जीवनमूल्ये, भक्ती, त्याग आणि माता-पित्यांच्या संस्कारांचे महत्त्व प्रभावी शब्दांत सांगितले.

महाराज म्हणाले, श्राद्ध घालताना कर्मकांडापेक्षा श्रद्धा महत्त्वाची असते. आई ही संपूर्ण घराची सावली असते. पुढची पिढी सद्विचारी आणि सात्त्विक घडवायची असेल, तर माता-पित्यांचे आचरणही तितकेच आदर्श असले पाहिजे. 'आपुलिया हिता जो असे जागता, धन्य माता-पिता कुळी कन्या-पुत्र होती' या संतवचनाचा दाखला देत त्यांनी संस्कारांचे महत्त्व अधोरेखित केले.

प्रत्येकाला एक दिवस मृत्यूला सामोरे जायचे आहे; मात्र सद्कार्य करताना मृत्यू येणे हे भाग्याचे लक्षण आहे. कोणतेही क्षेत्र असो, माणसाने हिरा-मोत्याप्रमाणे स्वतःचे कर्तृत्व सिद्ध केले पाहिजे. भक्तीमध्ये बाह्य वेशभूषेपेक्षा अंतःकरणातील भाव, निष्ठा आणि आचरण अधिक महत्त्वाचे असते. केवळ वेश परिधान करून कोणी मोठे होत नाही, तर माणसाचे मोठेपण त्याच्या जीवनातील कृतीतून दिसते, असे त्यांनी सांगितले.

भाव हे भक्तीचे खरे वर्म असून, निष्ठुर माणूस कोणाच्याही उपयोगाचा नसतो. सद्भावना एकत्र आल्या की जीवन सुंदर बनते. स्वार्थापेक्षा त्यागातूनच माणूस खऱ्या अर्थाने यशस्वी होतो. 'संतती हीच आपली खरी संपत्ती' हा मोलाचा संदेश देत महाराजांनी उपस्थितांना अंतर्मुख केले. त्यांच्या विचारांनी पुण्यस्मरण सोहळ्याला भावपूर्ण आणि संस्कारमय स्वरूप प्राप्त झाले.

रामवाडीत आद्य क्रांतिगुरू वीर लहुजी वस्ताद साळवे यांची २३२ वी जयंती उत्साहात साजरी

वीर लहुजी वस्ताद साळवे यांच्या राष्ट्रभक्तीचा विद्यार्थ्यांमध्ये जागर मानवी हक्क अभियानातर्फे जयंती सोहळा साजरा



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– आद्य क्रांतिगुरू वीर लहुजी वस्ताद साळवे यांच्या २३२ व्या जयंतीनिमित्त मानवी हक्क अभियानाच्या वतीने शहरातील रामवाडी परिसरात अभिवादन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी वीर लहुजी वस्ताद साळवे यांच्या महान कार्याचा जागर करण्यात आला. भारतीय स्वातंत्र्यलढ्यात त्यांनी दिलेले योगदान, क्रांतिकारकांना दिलेले प्रशिक्षण तसेच सामाजिक परिवर्तनासाठी केलेल्या कार्याचे स्मरण करून त्यांच्या विचारांना अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमाला स्नेहालयातील मुलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मानवी हक्क अभियानाचे जिल्हा कार्याध्यक्ष चंद्रकांत डोलारे होते. प्रमुख पाहुणे म्हणून कर्जत नगरपंचायतीचे नगरसेवक डॉ. राजेंद्र पवार उपस्थित होते. यावेळी लहान मुलांनी वीर लहुजी वस्ताद साळवे यांच्या जीवनकार्यावर आधारित भाषणे सादर केली. त्यांच्या पराक्रमाचा, देशप्रेमाचा आणि समाजासाठी केलेल्या कार्याचा परिचय मुलांनी आपल्या भाषणातून करून दिला.

स्नेहालयाच्या शिक्षिका जयश्री रासणे यांनी स्नेहालयातील प्रकल्पांची माहिती दिली. त्याचबरोबर वीर लहुजी वस्ताद साळवे यांच्या कार्याला अभिवादन केले. मानवी हक्क अभियानाचे जिल्हा संघटक अशोक भोसले यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत करून प्रास्ताविक केले. आजच्या युवकांनी क्रांतिगुरू वीर लहुजी वस्ताद साळवे यांचे विचार आत्मसात करणे आवश्यक असून, त्यांचे जीवनकार्य नव्या पिढीला देशप्रेम, सामाजिक बांधिलकी आणि संघर्षाची प्रेरणा देणारे असल्याचे त्यांनी सांगितले.

अध्यक्षीय भाषणात चंद्रकांत डोलारे यांनी वीर लहुजी वस्ताद साळवे यांच्या राष्ट्रप्रेम आणि सामाजिक योगदानावर प्रकाश टाकला. महात्मा ज्योतिराव फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांनी स्त्री शिक्षणासाठी उभारलेल्या संघर्षात लहुजी वस्ताद साळवे यांनी दिलेले योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण होते. सामाजिक परिवर्तनाच्या लढ्याला त्यांनी भक्कम साथ दिली. 'जगेल तर देशासाठी आणि मरेल तर देशासाठी' या प्रतिज्ञेतून त्यांची देशाप्रती असलेली निष्ठा, राष्ट्रभक्ती आणि समर्पणाची भावना स्पष्टपणे दिसून येते. त्यांचे विचार आणि कार्य आजही समाजाला दिशा देणारे आहेत, असे डोलारे यांनी नमूद केले.

या जयंती सोहळ्याचे औचित्य साधून स्नेहालयातील उपस्थित मुलांना मान्यवरांच्या हस्ते खाऊचे वाटप करण्यात आले. यावेळी सुनीता औटी, पोपटराव भोसले, डॉ. सुनील सकट, मानवी हक्क अभियानाचे जिल्हाध्यक्ष लखन साळवे, पवार तसेच जिल्हा सल्लागार गोविंद सातपुते यांच्या हस्ते मुलांना खाऊ देण्यात आला. उपमहापौर धनंजय जाधव, शहर जिल्हाध्यक्ष महेंद्र गंधे आणि नगरसेवक सागर मुर्तुडकर यांनी या सामाजिक उपक्रमाचे कौतुक करून जयंतीनिमित्त शुभेच्छा दिल्या.

वेशभूषा स्पर्धेत श्री समर्थ विद्यामंदिरच्या विद्यार्थिनींचे घवघवीत यश

विविध ऐतिहासिक व कर्तृत्ववान महिलांच्या भूमिकांतून विद्यार्थिनींनी साकारला प्रेरणादायी आविष्कार; अनेक पुरस्कारांवर उमटवली मोहोर



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– विचार भारतीच्या वतीने पेमराज सारडा महाविद्यालय येथे नवरात्रोत्सवानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या वेशभूषा स्पर्धेत श्री समर्थ विद्यामंदिर प्रशालेच्या विद्यार्थिनींनी उल्लेखनीय यश संपादन केले. विविध ऐतिहासिक, सामाजिक आणि कर्तृत्ववान महिलांच्या वेशभूषा साकारत विद्यार्थिनींनी आपल्या कलागुणांचे प्रभावी प्रदर्शन केले. या स्पर्धेत प्रशालेच्या विद्यार्थिनींनी प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक मिळवत प्रशालेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला.

स्पर्धेतील गट क्रमांक २ (इयत्ता पाचवी व सहावी) मध्ये कु. ओवी ललित कुलकर्णी हिने तुळजाभवानी मातेची वेशभूषा साकारत प्रथम क्रमांक मिळविला, तर कु. गौरी संपत कोळेकर हिने राणी लक्ष्मीबाई यांची भूमिका साकारत द्वितीय क्रमांक पटकाविला. गट क्रमांक ३ (इयत्ता सातवी व आठवी) मध्ये कु. श्रीशा पंकज आकडकर हिने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची वेशभूषा साकारत प्रथम क्रमांक मिळविला, तर कु. राजलक्ष्मी अनिल गुंड हिने डॉ. आनंदीबाई जोशी यांची भूमिका साकारत द्वितीय क्रमांक मिळविला.

गट क्रमांक ४ (इयत्ता नववी व दहावी) मध्ये कु. अपूर्वा नितीन खंडागळे हिने राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची वेशभूषा साकारत प्रथम क्रमांक मिळविला, तर कु. अंजली दीपक जाधव हिने राजमाता जिजाऊ यांची भूमिका साकारत तृतीय क्रमांक पटकाविला. या सर्व यशस्वी विद्यार्थिनींना प्रशस्तीपत्रक व ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले.

या विद्यार्थिनींना सौ. चैताली नवले, सौ. ज्योती कोहकडे आणि सौ. योगिता कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले. स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थिनींना भारतीय इतिहासातील कर्तृत्ववान महिलांचे कार्य, त्यांचे विचार आणि समाजासाठी दिलेले योगदान जाणून घेण्याची संधी मिळाली. या यशाबद्दल शालेय समितीचे चेअरमन ॲड. किशोरजी देशपांडे, संस्थेचे सर्व पदाधिकारी, मुख्याध्यापिका सौ. वसुधा जोशी, पर्यवेक्षिका सौ. शारदा होशिंग, सर्व शिक्षकवृंद आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी यशस्वी विद्यार्थिनी व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन करून कौतुक केले.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) ख्रिश्चन सेलच्या अहिल्यानगर जिल्हा उपाध्यक्षपदी प्रियंका दुशिंग



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष-शरदचंद्र पवार पक्षाच्या महाराष्ट्र प्रदेश ख्रिश्चन सेलचा मेळावा व पदग्रहण सोहळा राष्ट्रवादी भवन शिवाजीनगर पुणे येथे नुकताच उत्साहात पार पडला. या सोहळ्यात ख्रिश्चन सेलचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब साळवे यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि मान्यवरांच्या हस्ते प्रियांका विल्यम दुशिंग यांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या अहिल्यानगर जिल्हा उपाध्यक्ष (ख्रिश्चन सेल) पदी निवड करण्यात आली.

कार्यक्रमास महाराष्ट्र प्रदेश चिटणीस अशोक बागुल, उत्तर जिल्हाध्यक्ष ॲड.संदीप वर्पे,उत्तर जिल्हाध्यक्ष (ख्रिश्चन सेल) विजय बारसे पुणे शहराचे अध्यक्ष श्रीकांत पाटील , विशाल तांबे, मयूर गायकवाड पुणे शहर अध्यक्ष (ख्रिश्चन सेल) विजय बारसे (अ-नगर जिल्हा अध्यक्ष) यांची विशेष उपस्थिती होती. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून एमॅरिस टूर्स अँड ट्रॅव्हल्सचे संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी सेल्वम रामकृष्णन नदार हे उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब साळवे म्हणाले की ख्रिश्चन समाजाचे विविध प्रश्न आणि मागण्या राष्ट्रीय अध्यक्ष खासदार शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या नेतृत्वाखाली शासनापर्यंत पोहोचवून सोडवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील.ख्रिश्चन समाजाच्या प्रश्नांवर प्राधान्याने काम करणार असून लवकरच ख्रिश्चन समाजाचा एक भव्य राज्यस्तरीय मेळावा आयोजित करण्यात येणार आहे . ज्येष्ठ नेते शरदचंद्रजी पवार राष्ट्रीय कार्याध्यक्ष खासदार सुप्रियाताई सुळे, ऑल इंडिया ख्रिश्चन कौन्सिलचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. हनोक गेरा यांना निमंत्रित करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

निवड पत्र स्वीकारताना प्रियांका दुशिंग यांनी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष, खासदार पद्मविभूषण शरदचंद्रजी पवार साहेब यांचे विचार आणि पक्षाची ध्येय-धोरणे तळागाळापर्यंत पोहोचवून, पक्षाची संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करण्यासाठी पूर्ण निष्ठेने आणि सर्वशक्तीनिशी काम करून पक्षाच्या विचारांचा प्रसार आणि संघटनात्मक बांधणीवर भर देणार असल्याचे सांगितले .

मेळाव्यात अहिल्यानगर ,उत्तर जिल्हा, श्रीरामपूर शहर, पुणे शहर तसेच महाराष्ट्र प्रदेश ख्रिश्चन सेलच्या विविध पदाधिकाऱ्यांची नियुक्ती जाहीर करण्यात आली. यावेळी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या शेवटी सामाजिक न्याय, समाजाचे हक्क आणि सर्वांगीण विकासासाठी सर्वांनी एकत्रित येऊन काम करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. प्रियांका दुशिंग यांच्या अहिल्यानगर जिल्हा उपाध्यक्षपदी झालेल्या निवडीबद्दल सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

निरागस हास्याने फुलला बालदिन; स्नेहबंधने गरजू मुलांसोबत साजरा केला आनंदोत्सव!

फुगे, चॉकलेट आणि बिस्किटांच्या भेटीने चिमुकल्यांच्या चेहऱ्यावर खुलले आनंदाचे हास्य

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



अहिल्यानगर– बालपण म्हणजे खेळ, हसू, मस्ती आणि आनंदाचे क्षण! मात्र आर्थिक परिस्थितीमुळे अनेक मुलांना या आनंदापासून वंचित राहावे लागते. अशाच गरजू आणि वंचित मुलांच्या आयुष्यात आनंदाचे काही क्षण फुलविण्याच्या उद्देशाने स्नेहबंध सोशल फौंडेशनच्या वतीने सावेडी येथील रासनेनगर परिसरातील पालांमध्ये राहणाऱ्या मुलांसोबत बालदिन उत्साहात साजरा करण्यात आला.

स्नेहबंध सोशल फौंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांच्या संकल्पनेतून आयोजित या उपक्रमात मुलांना रंगीबेरंगी फुगे, चॉकलेट आणि बिस्किटांचे वाटप करण्यात आले. हातात फुगे आणि चेहऱ्यावर आनंदाचे हास्य घेऊन मुलांनी बालदिनाचा मनमुराद आनंद लुटला. फुग्यांशी खेळताना, एकमेकांसोबत हसताना आणि मिळालेल्या भेटींचा आनंद व्यक्त करताना या चिमुकल्यांच्या चेहऱ्यावर उमटलेले समाधान खऱ्या अर्थाने बालदिनाचे महत्त्व अधोरेखित करणारे होते.

बालदिन हा केवळ आनंद साजरा करण्याचा दिवस नसून समाजातील प्रत्येक मुलाला आनंदाने जगण्याची संधी मिळाली पाहिजे, याची जाणीव करून देणारा दिवस आहे. आर्थिक परिस्थिती कोणतीही असो, प्रत्येक मुलाला बालपणातील आनंदाचे क्षण अनुभवण्याचा अधिकार आहे. याच भावनेतून स्नेहबंधने या मुलांमध्ये जाऊन त्यांच्यासोबत आनंद वाटून घेतला.

या छोट्याशा उपक्रमातून मुलांच्या चेहऱ्यावर उमटलेले हास्य आणि त्यांच्या निरागस प्रतिक्रिया उपस्थितांसाठी समाधान देणाऱ्या ठरल्या. यावेळी स्नेहबंध सोशल फौंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांच्यासह निशांत पानसरे, प्रथमेश राठोड आदी उपस्थित होते.

''मुलांच्या चेहऱ्यावरील आनंद हेच आमचे खरे समाधान!''

बालदिन हा प्रत्येक मुलाचा आनंदाचा दिवस आहे. मात्र समाजातील काही मुलांना परिस्थितीमुळे असे आनंदाचे क्षण अनुभवता येत नाहीत. अशा मुलांच्या आयुष्यात थोडासा आनंद निर्माण करता आला, त्यांच्या चेहऱ्यावर हसू फुलवता आले, तर त्यापेक्षा मोठे समाधान नाही. समाजातील प्रत्येक घटकातील मुलांना समानतेने बालपणाचा आनंद घेता यावा, यासाठी स्नेहबंध सोशल फौंडेशन यापुढेही असे उपक्रम राबवत राहील.

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा
फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

साईबन कृषी पर्यटन येथे हुर्डा महोत्सवाचे शानदार उद्घाटन

हुर्डा महोत्सव ही तर आपली संस्कृती – आनंद भंडारी



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– येथील एम.आय.डी.सी. परिसरातील साईबन कृषी पर्यटन क्षेत्र येथे नुकतेच जगातील पहिल्या हुर्डा महोत्सवाचे शानदार उद्घाटन दिमाखात संपन्न झाले. पर्यावरण पूरक शेगडी द्वारे हुरड्याच्या अग्नीचे प्रज्वलन मान्यवरांच्या हस्ते करण्यात येऊन हुरड्याचे कणीस भाजून उद्घाटन करण्यात आले. मान्यवरांमध्ये जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी डॉक्टर आनंद भंडारी, डेप्युटी कलेक्टर मनीषा राशिनकर, पश्चिम महाराष्ट्र प्रांत संघचालक नाना जाधव, महापौर ज्योतीताई गाडे, जिल्हा कृषी अधिकारी सुधाकर बोराळे, साईबनचे संचालक मालक डॉक्टर सुधा व डॉक्टर प्रकाश कांकरिया तसेच डॉक्टर वर्धमान व डॉक्टर श्रुतिका कांकरिया सहित अनेक बालगोपाळ उपस्थित होते. सदर प्रसंगी डॉक्टर आनंद भंडारी म्हणाले की हुरडा महोत्सव ही आपली संस्कृती आहे हुरडा आरोग्यासाठी तर उत्तम आहेच परंतु त्यामुळे एकोपा वाढतो तसेच स्नेहाच्या धाग्याची वीण अधिक घट्ट होते. साईबन चा हुरडा स्पेशल आहे. तो चवदार व कोवळा तर आहेच आहे परंतु दरवर्षी सर्वात पहिल्यांदा त्याचा शुभारंभ करण्याचा मानही साईबनला जातो. साईबन येथे हुरडा महोत्सवा बरोबरच अनेक पर्यावरण पूरक व मनाला आनंद देणारे नैसर्गिक दालने आहेत. संस्कृतीचे संवर्धन करणारा पपेट शो, बोटिंग, झिप लाईन तसेच नक्षत्र उद्यान, बटरफ्लाय गार्डनचाही आनंद येथे घेता येतो. नगरकरांनी याचा नक्कीच आनंद घ्यायला हवा.

नाना जाधव म्हणाले की, माणसाकडे संपत्ती असणे आणि ती केवळ स्वतःच्या समृद्धीसाठी वापरणे ही आजच्या काळात फारशी नवीन गोष्ट राहिलेली नाही; पण मिळालेल्या संपत्तीचा आणि कर्तृत्वाचा मोठा हिस्सा समाजातील वंचितांसाठी, अंधांसाठी आणि दुष्काळग्रस्तांसाठी आनंदाने अर्पण करणारी मोजकीच व्यक्तिमत्त्वे समाजात पाहायला मिळतात. आंतरराष्ट्रीय कीर्तीचे नेत्रतज्ज्ञ डॉ. प्रकाश कांकरिया तसेच आपल्या समाजकार्याच्या तपश्चर्येमुळे आंतरराष्ट्रीय नोबल पीस अवॉर्ड साठी ज्यांचे नामांकन झालेले आहे अशा डॉ सौ सुधा कांकरिया हे या मोजक्या आणि सुवर्णमयी व्यक्तिमत्त्वांपैकी एक दांपत्य आहे. आज डॉ. प्रकाश कांकरिया यांचा ७१ वा वाढदिवस अहिल्यानगरातील साईबन कृषी पर्यटन केंद्रात अतिशय साधे, पण मानवतावादी मूल्यांचा सुगंध पसरवणारा असा भव्य आणि प्रेरणादायी सोहळा म्हणून संपन्न झाला.

डॉ. कांकरिया यांच्या वाढदिवसाचा हा सोहळा म्हणजे निव्वळ हार-तुरे आणि अभिनंदनाचा सोहळा नव्हता, तर तो समाजऋण फेडण्याचा एक यज्ञ होता. यानिमित्ताने दुष्काळग्रस्तांच्या मदतीसाठी मुख्यमंत्री सहायता निधीमध्ये १ लाख ७१ हजार रुपयांचा धनादेश सुपूर्द करण्यात आला. याशिवाय, राष्ट्रीय दृष्टीहीन संघ, महाराष्ट्र या संस्थेस अंध व्यक्तींसाठी उभारण्यात येत असलेल्या वृद्धाश्रमासाठी दहा गुंठे जमीन भूदान म्हणून देण्याचा अत्यंत सढळ आणि स्तुत्य निर्णय कांकरिया दाम्पत्याने घेतला. माणुसकीचे हे दर्शन उपस्थितांच्या डोळ्यात आनंदाश्रू आणणारे ठरले. कृषी अधिकारी सुधाकर बोराळे म्हणाले की सध्या दुष्काळाचे वातावरण आहे त्यामुळे शेतकरी बंधूंना प्रोत्साहित करण्यासाठी जास्तीत जास्त व्यक्तींनी हुर्डा महोत्सवात सहभागी व्हावे. कडधान्यांमध्ये हुर्डा हा राजा आहे. त्याचे अनेक गुणधर्म आरोग्यासाठी उत्तम व संस्कृतीची उन्नती करणारे आहेत. महापौर ज्योती गाडे यांचे शुभेच्छापर भाषण झाले.आपल्या सत्काराला उत्तर देताना राष्ट्रीय दृष्टीहिन संघ महाराष्ट्रचे महासचिव श्री जाधव म्हणाले की, डॉ. कांकरिया परिवाराने दिलेल्या भूदानाचे आम्ही सोने करू. त्या जागेवर लवकरच अंध बांधवांना आत्मनिर्भर करण्यासाठीचे अनेक प्रकल्प तसेच भविष्यात वृद्धाश्रमाचेही नियोजन करण्यात येईल. डॉ. कांकरिया परिवाराचे हे ऋण आम्ही कधीही फेडू शकणार नाही.

सुरुवातीस डॉ. सुधा कांकरिया यांनी स्वागत केले व डॉ. प्रकाश कांकरिया यांच्या ७१ व्या वाढदिवसानिमित्त दुष्काळग्रस्तांच्या मदतीसाठी एक लाख ७१ हजार रुपये मुख्यमंत्री सहाय्यता निधीचा धनादेश तसेच राष्ट्रीय दृष्टीहिन संघ महाराष्ट्रला दहा गुंठे जमीन भूदान व 'साईसूर्य दृष्टीसेवा जीवनगौरव पुरस्कार तसेच अनाम प्रेम संस्थेला ११,००० रुपये चा धनादेश व 'मानकऱ्हैय्या दृष्टीप्रेम सन्मान दिल्याची घोषणा केली. डॉ. प्रकाश कांकरिया यांच्या ७१ व्या वाढदिवसानिमित्त मोठ्या उत्साहाने औक्षण व केक कटिंगचा कार्यक्रम संपन्न झाला. हुर्डा पार्टी, वनभोजन, गप्पागोष्टी, गीत-संगीताची मेजवानी अशी दिलखुलास धमाल करीत नगरकरांनी एक आगळा-वेगळा आनंद उत्सव साजरा केला. शेवटी डॉ. वर्धमान कांकरिया यांनी आभार मानले.

विद्यार्थ्यांनी कल्पनाशक्ती विकसित करून चिकित्सक दृष्टिकोन जोपासावा : ॲड. सतीशचंद्र सुद्रिक

समर्थ विधी महाविद्यालयात प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– कायद्याचे शिक्षण घेताना विद्यार्थ्यांनी नियमित वाचन, सर्वांगीण ज्ञान आणि चिकित्सक दृष्टिकोन विकसित करणे आवश्यक आहे. वकिली व्यवसायात केवळ कायद्याचे ज्ञान पुरेसे नसून कल्पनाशक्तीचा प्रभावी वापर करून प्रत्येक प्रकरणाचा विविध अंगांनी विचार करण्याची क्षमता विद्यार्थ्यांनी आत्मसात करावी, असे प्रतिपादन ज्येष्ठ विधितज्ज्ञ ॲड. सतीशचंद्र सुद्रिक यांनी केले.

बेल्हे (ता. जुन्नर) येथील समर्थ विधी महाविद्यालयात प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या स्वागत समारंभात ते बोलत होते. यावेळी ॲड. सुद्रिक म्हणाले की, फौजदारी न्यायालयातील कामकाज प्रभावीपणे हाताळण्यासाठी वकिलांनी प्रत्येक प्रकरणाचा सर्वंकष अभ्यास करणे गरजेचे आहे. न्यायालयीन कामकाजाबरोबरच समाजातील विविध क्षेत्रांचे ज्ञान वकिलांना असणे आवश्यक आहे. सामाजिक भान राखून तसेच पक्षकाराच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करून वकिलांनी आपली जबाबदारी पार पाडावी. सातत्यपूर्ण वाचन आणि व्यापक दृष्टिकोन यामुळेच कायद्याच्या क्षेत्रात प्रभावी काम करता येते.

विद्यार्थ्यांनी केवळ परीक्षेपुरते शिक्षण न घेता



प्रत्यक्ष व्यवहारातील अनुभव, सामाजिक परिस्थिती आणि न्यायव्यवस्थेतील बारकावे समजून घ्यावेत. प्रत्येक विषयाकडे चिकित्सक नजरेने पाहण्याची सवय लावावी, असेही त्यांनी सांगितले.

नयावेळी संस्थाध्यक्ष वसंत शेळके, उपाध्यक्ष माउली शेळके, सचिव विवेक शेळके, विश्वस्त वल्लभ शेळके, स्नेहल शेळके, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुनील कवडे, डॉ. राजीव सावंत आदी उपस्थित होते. याप्रसंगी ॲड. सतीशचंद्र सुद्रिक यांचा प्राचार्य डॉ. सुनील कवडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

विशेष म्हणजे, ॲड. सुद्रिक यांचे राज्यातील हे २३ वे कायदे विषयक व्याख्यान होते. त्यांच्या मार्गदर्शनामुळे विधी शाखेतील नवोदित विद्यार्थ्यांना कायद्याच्या अभ्यासासोबतच वकिली व्यवसायातील सामाजिक जबाबदारीची जाणीव झाली.

दै. आकर्षण निवडक



सकल जैन समाज, अहिल्यानगर व समर्पण चातुर्मास समिती च्या वतीने सौरभ बोरा यांना समाजरत्न पुरस्कार आ.संग्राम भैय्या जगताप व हभप संग्राम बापू भंडारे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला यावेळी विश्वस्त व मोठ्या संख्येने मान्यवर, समाज बांधव उपस्थित होते.

५० टक्के महागाई भत्ता मूळ वेतनात विलीन करा; शिक्षक भारतीची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

अहिल्यानगर - राज्यातील शासकीय, निमशासकीय तसेच अनुदानित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या मूळ वेतनात ५० टक्के महागाई भत्ता विलीन करण्याचा शासन निर्णय तातडीने निर्गमित करावा, अशी मागणी शिक्षक भारती संघटनेच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे करण्यात आली आहे. अशी माहिती शिक्षक नेते तथा शिक्षक भरतीचे राज्य सचिव सुनील गाडगे यांनी दिली. केंद्र शासनाने १ जानेवारी २०२६ पासून केंद्रीय अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या मूळ वेतनात ५० टक्के महागाई भत्ता विलीन करण्याचा निर्णय घेतल्याचा संदर्भ निवेदनात देण्यात आला आहे. केंद्र व राज्य कर्मचाऱ्यांच्या वेतनमानात समानता राखण्याच्या धोरणानुसार महाराष्ट्रातील कर्मचाऱ्यांनाही सध्या मिळणाऱ्या ६० टक्के महागाई भत्त्यापैकी ५० टक्के महागाई भत्ता मूळ वेतनात विलीन करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. या निर्णयाचा लाभ कार्यरत कर्मचाऱ्यांसह सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनाही मिळावा आणि त्याबाबत शासन आदेशात स्पष्ट तरतूद करावी, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. कर्मचाऱ्यांच्या आर्थिक हिताच्या दृष्टीने हा निर्णय महत्त्वाचा असल्याने शासनाने तातडीने सकारात्मक भूमिका घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. या मागणीसाठी शिक्षक भारतीचे जिल्हाध्यक्ष तथा माध्यमिक शिक्षक सोसायटीचे उपाध्यक्ष आप्पासाहेब जगताप, विजय लंके .आनंद झरेकर .आशा लंके/गाडगे .जिल्हा सचिव विजय कराळे, जिल्हा कार्याध्यक्ष संजय पवार, कैलास जाधव, कार्यवाह संजय भुसारी, योगेश हराळे, नवनाथ घोरपडे, सुदाम दिघे, संभाजी पवार, हनुमंत रायकर, सिकंदर शेख, संतोष देशमुख, किसन सोनवणे, संतोष शेंदुरकर, संभाजी चौधरी, श्रीकांत गाडगे, रेवण घंगाळे, महिला जिल्हाध्यक्ष अशा मगर .विभावरी रोकडे, मीनाक्षी सूर्यवंशी, रोहिणी भोर, शकुंतला वाळुंज, छाया लष्करे, जया गागरे, रूपाली बोरुडे, सोनाली अकोलकर तसेच विनाअनुदानित राज्याध्यक्ष रूपाली कुरूमकर यांनी पाठिंबा दिला आहे.

अहिल्यानगर केडगाव येथे जगद्गुरू श्रीमद् रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी यांचा दोन दिवसीय दर्शन व समस्या

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– जगद्गुरू श्रीमद् रामानंदाचार्य नरेंद्राचार्य दक्षिण पीठ नाणीजधाम संस्थान.. (उपपीठ उत्तर महाराष्ट्र,नाशिक) यांच्या वतीने जगद्गुरू श्रीमद् रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी यांचा दोन दिवसीय समस्या मार्गदर्शन व दर्शन सोहळा शनिवार दि. २१ व रविवार दि. २२ नोव्हेंबर २०२६ रोजी आयोजित करण्यात आला आहे. नगर-पुणे रोडवरील केडगाव येथील इंडस्ट्रीज एरिया समोरील निशा लॉन येथे सकाळी ९ वाजता या सोहळ्याचे

संस्थानच्या अंधश्रद्धा निर्मूलन व सामाजिक उपक्रमांतर्गत या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या दोन दिवसीय सोहळ्यात शनिवारी दि. २१साधक दीक्षा तर रविवारी दि. २२ उपासक दीक्षा व बाल उपासक दीक्षा सोहळा पार पडणार आहे. यासाठी भाविकांनी नोंदणी करून या संधीचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

जगद्गुरू श्रीमद् रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी यांच्या प्रेरणेतून



जगद्गुरु श्रीमद् रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी

संस्थानमार्फत देशभरात अनेक समाजोपयोगी उपक्रम राबवले जातात २०१६ ते ऑक्टोबर २०२६ या कालावधीत वैद्यकीय शिक्षणासाठी २६७ मरणोत्तर देहदान आणि गरजू रुग्णांसाठी २३२अवयवदान करण्यात आले आहे. जानेवारी २०२६ मध्ये अवघ्या १५ दिवसांत १ लाख ७१ हजार १५० रक्तपिशव्यांचे संकलन झाले. तसेच गेल्या १७ वर्षांपासून राज्यातील १० प्रमुख राष्ट्रीय महामार्गांवर ५५ मोफत रुग्णवाहिका आणि १ कार्डियाक रुग्णवाहिका २४ तास कार्यरत असून या माध्यमातून ३५,६७० हून अधिक अपघातग्रस्तांचे प्राण वाचले आहेत.पाणी आडवा, पाणी जिरवा मोहिमे अंतर्गत डिसेंबर २०२५ मध्ये ४,५९८ कच्चे बंधारे बांधण्यात आले . जुलै २०२६ मध्ये देशभरात ६ लाख १८ हजार ००९ वृक्षांची विक्रमी लागवड करण्यात आली. मोफत इंग्रजी माध्यमाची शाळा, वेदपाठ शाळा, आपत्कालीन मदत आणि महिलांना मोफत शिलाई यंत्र व घरघंटी वाटप असे उपक्रम सातत्याने सुरू आहेत. नुकताच ३१ ऑक्टोबर २०२६ रोजी नाशिक येथे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, जगद्गुरू नरेंद्राचार्यजी महाराज व विविध आखाड्यांच्या महंतांच्या उपस्थितीत सिंहस्थ कुंभमेळा ध्वजारोहण सोहळा संपन्न झाला.

तसेच अहिल्यानगर शहरामध्ये होत असलेल्या या आध्यात्मिक सोहळ्यासाठी जिल्ह्यातील भाविक,भक्त,साधक,शिष्य व नागरिकांनी सहकुटुंब उपस्थित राहून समस्या मार्गदर्शन व मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा असे आवाहन उत्तर महाराष्ट्र-नाशिक उपपीठाच्या वतीने करण्यात आले आहे.

मोफत मराठा वधुवर मेळाव्याचा लाभ घ्यावा – योगीराज गाडे

अखंड मराठा समाज व मराठा सोयरीक संस्थेचा उपक्रम

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– नगर शहरामध्ये अखंड मराठा समाज व मराठा सोयरीक संस्थेच्या वतीने आयोजित मोफत मराठा वधुवर परिचय मेळाव्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन अहिल्यानगर महानगरपालिकेचे नगरसेवक योगीराज शशिकांत गाडे यांनी केले आहे. हा मेळावा नगर शहरामध्ये हॉटेल यश ग्रँण्ड येथे (रेल्वे स्टेशन जवळ) शनिवार दिनांक २१ नोव्हेंबर २०२६ रोजी दुपारी ४ वाजता होणार आहे. या मेळाव्यासाठी शिवसेना माजी जिल्हाप्रमुख व विद्यमान जिल्हा संघटक प्रा.शशिकांत गाडे सर व यश उदयोग समूहाचे संचालक रमाकांत (नाना) गाडे यांचे सहकार्य लाभत आहे.

मराठा सोयरीक संस्थेचा हा ११३ वा मोफत मेळावा असल्याची माहिती शिक्षक सेनेचे शहर जिल्हाध्यक्ष पारुनाथ ढोकळे, भारतीय कामगार सेनेचे राज्य सहचिटणीस मधुकर निकम, मराठा सोयरीक संस्थेच्या संचलिका जयश्री अशोक कुटे, जगदंब फाउंडेशनचे अध्यक्ष गणेश लंघे, शिव गौरव मराठा उद्योग संघाचे संस्थापक अध्यक्ष राजेंद्र औताडे, प्रकाश जोंधळे,अंजना पठारे, संपतराव सोनवणे, मराठासेवक मनोज सोनवणे, उदय अनुभुले,शांतीलाल कोहक, मोहन हेलकुटे, प्रमोद झावरे, नानासाहेब दानवे, प्रा. योगेश कोतकर, ॲड, संदीप काळे, उज्वला शेळके,अन्नपूर्णा ढम, अनिल अकोलकर, सागर मोरे यांनी दिली आहे.

जगदंब फाउंडेशन अंतर्गत धर्मादाय कार्यालयामध्ये नाव नोंदणी केलेली मराठा सोयरिक संस्था ही महाराष्ट्रातील शासनमान्य अशी विश्वसनीय वधुवर सुचक संस्था आहे. तसेच जगदंब फाउंडेशन हे एकल महिला, अनाथ, निराधार मुलांसाठी भरीव सामाजिक कार्य करत आहे. या वधुवर संस्थेचे आतापर्यंत ११२ मोफत वधु वर मेळावे झालेले आहेत. तसेच ५००० पेक्षा जास्त लग्न संस्थेकडून जमलेले आहेत. या मेळाव्यासाठी अहिल्यानगर, पुणे, नाशिक, संभाजीनगर, बीड,मुंबई इत्यादी वेगवेगळ्या जिल्ह्यातून अनेक वधु-वर पालक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. मेळाव्यामध्ये वधूवरांना व पालकांना समोरासमोर स्थळ बघण्याची व चर्चा करण्याची सुवर्णसंधी यामध्ये आहे.

मेळाव्याच्या अधिक माहितीसाठी किंवा जे वधू वर पालक मेळाव्याला येऊ शकत नाही त्यांनी इतर मेळावाच्या माहितीसाठी ७४४७७८५९१० च्या नंबर वर संपर्क करावा. तसेच संस्थेचा पुढील मेळावा हा रविवार दिनांक २९ नोव्हेंबर २०२६ रोजी राहता तालुक्यात होणार असल्याची माहिती संस्थेने दिली आहे. जास्तीत जास्त वधू-वर पालकांनी मेळाव्याचा लाभ घेण्याचे आवाहन संस्थेने केले आहे.

स्नेहालयात २१ नोव्हेंबरला रंगणार लायन्सच्या दिवाळी मेळावा

लायन्स क्लब ऑफ अहिल्यानगरचा १९ वा दिवाळी मेळावा । गुरु अर्जुन सामाजिक प्रतिष्ठानचे सहकार्य



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– लायन्स क्लब ऑफ अहिल्यानगरच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही वंचित व गरजू मुलांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविण्यासाठी १९ व्या दिवाळी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा आनंद सोहळा शनिवार, दिनांक २१ नोव्हेंबर २०२६ रोजी सायंकाळी ४ वाजता स्नेहालय येथे आयोजित करण्यात आला आहे. या उपक्रमाला गुरु अर्जुन सामाजिक प्रतिष्ठानचे विशेष सहकार्य लाभणार आहे. सर्व नागरिकांना या आनंदसोहळ्यात सहभागी होण्याचे आवाहन अध्यक्ष हरजितसिंग वधवा, सचिव हरीश हरवानी, खजिनदार विजय कुलकर्णी आणि लिओ अध्यक्ष हर्ष किथानी यांनी केले आहे.

या दिवाळी मेळाव्यामध्ये मुलांसाठी विविध मनोरंजनात्मक कार्यक्रमांची रेलचेल असणार आहे. फन फेअर, बुढ्ढी के बाल, मिनी ट्रेन, फुगे, जंपिंग, विविध खेळ, मेहंदी, रांगोळी तसेच आकर्षक ऑर्केस्ट्रा आणि डीजे यांचा आनंद मुलांना घेता येणार आहे. लिओ क्लबच्या सदस्यांकडून विशेष खेळांचे आयोजन करण्यात येणार आहे. कार्यक्रमानंतर सर्वांसाठी अल्पोपहार व स्नेहभोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे.

या उपक्रमाचे प्रकल्प अध्यक्ष म्हणून दिलीप कुलकर्णी, प्रिया मुनोत, डॉ. अमित बडवे आणि गुरनूरसिंग वधवा जबाबदारी सांभाळत आहेत. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. एस. एस. दीपक, मोहनशेठ मानधना, सिमरतलाल बोरा आणि शरदभाऊ मुनोत उपस्थित राहणार आहेत. या मेळाव्याच्या यशस्वी आयोजनासाठी सुनील छाजेड, किरण भंडारी, कमलेश भंडारी, प्रशांत मुनोत, धनंजय भंडारे, अरविंद पारगावकर, डॉ. संजय असनानी, संतोष माणकेश्वर, योगेश भंडारी, संदेश कटारिया, सीए शंकर अंदानी, सुमित लोढा, तसेच लिओ ओम भंडारी आणि जपज्योत बग्गा प्रयत्नशील आहेत.

गेली १९ वर्षे सातत्याने सुरू असलेला हा उपक्रम म्हणजे सामाजिक बांधिलकी, माणुसकी आणि आनंद वाटण्याच्या भावनेचा सुंदर उत्सव ठरत आहे. वंचित व गरजू मुलांना दिवाळीचा आनंद अनुभवता यावा, त्यांच्या आयुष्यात आनंदाचे क्षण निर्माण व्हावेत, या उद्देशाने आयोजित करण्यात येणाऱ्या या मेळाव्याला अधिकाधिक नागरिकांनी उपस्थित राहून सहकार्य करावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

लाचलूचपत प्रतिबंधक गुन्हातील पाथर्डी पोलिस सचटेशन येथील पोलिस

कॉन्स्टेबल विनोद मासाळकर यांना छत्रपती संभाजीनगर खंडीपाठामध्ये जामीन मंजूर

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– याबाबत सविस्तर वृत्त असे की, पाथर्डी पोलिस स्टेशन येथे दि. २०/९/२०२६ येथे गुन्हा रजि. नं. ११५२/२०२६ हा भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम ७ नुसार दाखल झाला होता. सदर प्रकारणामध्ये पोलिस उपअधिक्षक लाचलूचपत प्रतिबंधक विभाग नाशिक यांनी सरकारतर्फे फिर्याद दिली होती की, त्यांना दि. १७/९/२०२६ रोजी तक्रार प्राप्त झाल्यानंतर त्यांनी व इतर पोलिस स्टाफ यांनी दि. १९/९/२०२६ रोजी सापळा आयोजित करून लोकसेवक हे दि. १८/९/२०२६ रोजी पाथर्डी पोलिस स्टेशन येथे गुन्हा दाखल करणचयात येणार होता. प्रताप उर्फ भावड्या व अरबाज हे तक्रारदाराकडे कामाला असल्याने लोकसेवक मासाळकर यांनी त्यांच्या विरूध्द दाखल गुन्ह्यात तपास करण्याच्या मोबदल्यात पाच लाखाची मागी केली होती. त्यानुसार सापळा आयोजित करून लोकसेवक विनोद मासाळकर यांना अटक केली होती. सदर गुन्ह्यामध्ये मा. सत्र न्यायालयाने आरोपीचा जामीन दि. ३०/९/२०२६ रोजी फेटाळल्यानंतर आरोपीने उच्च न्यायालयामध्ये ॲड. एन.बी. नरवडे यांच्यामाफरत जामीन अर्ज दाखल केला होता. सदरी अर्जाच्या सुनावणी दरम्यान मा. उच्च न्यायालयाचे न्यायमुर्ती श्री. हितेन एस. वेनेगावकर यांनी आरोपी पक्षाचा तसेच सरकारी पक्षाचा युक्तीवाद ऐकल्यानंतर आरोपीस जामीन मंजूर केला. सदर प्रकरणामध्ये आरोपीच्या वतीने ॲड. एन.बी. नरवडे यांनी काम पाहिले.

कलावंताना शासन दरबारी वाव मिळण्यासाठी लोकनेते खासदार नीलेश लंके साहेब यांच्याकडून पाठपुरावा

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

पारनेर– महाराष्ट्र ही कलावंतांची भूमी आणि हल्लीच्या काळात कला सध्या लोक पावत चाललेली आहे परंतु महाराष्ट्र सरकारचे त्याकडे लक्ष नाही परंतु महाराष्ट्रातले सगळे कलावंत बोलावून एकदा लोकनेते खासदार नीलेश लंके साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली एकदा मंत्रालयावर मोर्चा काढावा आणि आपल्या कलावंतांचा अनुदानाचा मार्ग मोकळा करावा अशी अपेक्षा रवींद्र राजदेव टाकळी ढोकेश्वर गटाचे नेते यांनी व्यक्त केली

राजदेव यांनी विठाबाई यांच्या शब्दात पोटासाठी नाचते मी परवा कुणाची यासाठी कलावंत आपली सगळी एनर्जी खर्च करून स्टेज वर आपली कला दाखवत असतो ,समाजाच्या भावना वेगळ्या असतात परंतु घर दार आणि लेकरं बाळ सोडून आपल्या कला दाखवत असतात,ह्या कलावंताला मासिक मानधन मिळाले पाहिजे कला जागृत राहिली पाहिजे अशी अपेक्षा व्यक्त केली ,यावेळी बाजार समिती चे संचालक शिवाजीराव बेलकर ,माजी सरपंच रामभाऊ थोरात ,बाळासाहेब शिरतार,अमोल चौधरी ,रामदास साळवे ,हरिभाऊ साळवे,जिजाबाहू चिकने,नवनाथ गांजे,संजय शिरतार,संदीप चिकने, रामलाल राजदेव,आणि पत्रकार बंधू विनोद गायकवाड ,गणेश जगदाळे ,श्रीनिवास शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते



शिवमहापुराण कथा सप्ताहात व्यासपीठावर साकारला शिव–पार्वती विवाह सोहळा

ह.भ.प. समाधान महाराज शर्मा यांच्या वाणीतून विवाह सोहळ्याचे निरूपण; भक्तांचा उत्स्फूर्त सहभाग
आमदार संग्राम जगताप यांनी पार पाडली पार्वतीच्या मामाची भूमिका; पुष्पवृष्टी आणि फुगडीने रंगला सोहळा



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– दिल्ली गेट येथील सिद्धेश्वर महादेव मंदिर व श्री साई द्वारका सेवा ट्रस्ट तसेच उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांच्या संकल्पनेतून आयोजित शिवमहापुराण कथा सप्ताहाचा चौथा दिवस भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. यावेळी ह.भ.प. समाधान महाराज शर्मा यांनी आपल्या ओघवत्या वाणीतून शिव-पार्वती विवाह सोहळ्याचे निरूपण केले. या कथेनिमित्त व्यासपीठावर पारंपरिक पद्धतीने शिव-पार्वती विवाह सोहळा मोठ्या उत्साहात साकारण्यात आला. पुष्पवृष्टी, मंगलमय वातावरण आणि भाविकांच्या सहभागामुळे संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला.

भगवान शंकर आणि माता पार्वती यांचा विवाह सोहळा हिंदू धर्मातील अत्यंत पवित्र आणि मंगलमय सोहळा मानला जातो. हा विवाह प्रेम, श्रद्धा, त्याग, तपश्चर्या आणि समर्पणाचे प्रतीक आहे. भगवान शिव हे वैराग्याचे, तर माता पार्वती या शक्तीचे प्रतीक मानल्या जातात. शिव आणि शक्ती यांच्या मिलनातून सृष्टीच्या संतुलनाचा संदेश मिळतो. या सोहळ्यातून कुटुंबव्यवस्था, संस्कार आणि धार्मिक परंपरांचे महत्त्व अधोरेखित होते.

माता पार्वती यांनी भगवान शिव यांना पती म्हणून प्राप्त करण्यासाठी कठोर तपश्चर्या केली. त्यांच्या भक्तीने आणि निष्ठेने प्रसन्न होऊन भगवान शिव यांनी त्यांचा विवाह स्वीकारला. हिमालय पर्वतावर भगवान शिव आणि माता पार्वती यांचा दिव्य विवाह सोहळा संपन्न झाला. हा सोहळा प्रेम, शक्ती, भक्ती आणि समर्पणाचा पवित्र संगम आहे. भाविकांना सुखी वैवाहिक जीवन, कौटुंबिक एकता आणि आध्यात्मिक शांतीचा संदेश या विवाह सोहळ्यातून मिळतो.

जगाच्या कल्याणासाठी महादेवांनी विवाह केला. धार्मिकतेतून संस्कारित पिढी निर्माण होते. गळ्यात माळ घालून लोकांचा काटा काढणे, याच्याइतके पाप दुसरे नाही. जोपर्यंत घरातील माणूस आपल्यासोबत असतो, तोपर्यंत त्याची किंमत कळत नाही. त्यामुळे थोडेच जगा, पण चांगले जगा; बेईमानीचे जीवन जगू नका. देवासमोर लावलेला दिवा मनाला प्रकाश देतो. आपला श्वासदेखील मनाच्या नियंत्रणाशी जोडलेला आहे. त्यामुळे समाजात वावरताना समाजाच्या कल्याणासाठी काम केले पाहिजे, असे प्रतिपादन ह.भ.प. समाधान महाराज शर्मा यांनी केले.

शिवमहापुराण कथा सप्ताहाच्या चौथ्या दिवशी शिव-पार्वती विवाह सोहळ्याचे निरूपण आणि प्रत्यक्ष विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आमदार संग्राम जगताप,सौ. धनश्री सुजय विखे पाटील, छायाताई फिरोदिया, व्याख्याते गणेश शिंदे, राजाभाऊ मुळे, राजेंद्र बलदोटा, नगरसेवक महेश लोंढे, रवींद्र बारस्कर, संभाजी पवार,महेंद्र बिज्जा,बाबासाहेब सानप, अनिल जोशी,अशोक गायकवाड, विश्व् हिंदू परिषदेचे गजेंद्र सोनवणे, अमोल भांबरकर, हरिभाऊ डोळसे,राहुल जामगावकर,प्रितम मुथा, मुकुल गंधे,पद्मावती बोरुडे, वैभव कोटा,मनीष लोढा, अमोल भंडारे, महेश कुलकर्णी आदींसह मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते.

आमदार संग्राम जगताप म्हणाले की, शिवमहापुराण कथेतून भाविकांनी धार्मिकतेचे चांगले विचार घेऊन जावेत. या विचारांच्या माध्यमातून संस्कारित पिढी घडविण्यासाठी प्रत्येकाने प्रयत्न करावेत. उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांच्या संकल्पनेतून दिल्लीगेट येथे आयोजित शिवमहापुराण कथेच्या माध्यमातून व्यासपीठावर प्रत्यक्ष शिव-पार्वती विवाह सोहळ्याचा धार्मिक उत्सव साकारण्यात आला. शिवभक्तांचा आनंद गगनात मावेनासा झाला असून, असे भक्तिमय दृश्य पाहायला मिळाले, असे त्यांनी सांगितले.

कृत्रिम बुद्धिमत्तेला ही हरवणारे बुद्धिबळपटू ठरले विजेते; शौनक बडोले नागपूर प्रथम, श्रीराज भोसले कोल्हापूर द्वितीय!

शांतीकुमारजी फिरोदिया अखिल भारतीय खुल्या आंतरराष्ट्रीय मानांकन बुद्धिबळ स्पर्धेचा समारोप

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



अहिल्यानगर– बुद्धिबळ खेळाच्या प्रचार आणि प्रसारासाठी अहिल्यानगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या शांतीकुमारजी फिरोदिया अखिल भारतीय खुल्या आंतरराष्ट्रीय मानांकन बुद्धिबळ स्पर्धेचा उत्साहपूर्ण वातावरणात समारोप झाला. देशभरातून २५० हून अधिक खेळाडूंनी सहभाग घेतलेल्या या स्पर्धेत शौनक बडोले नागपूर याने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत प्रथम क्रमांक पटकावला, तर श्रीराज भोसले कोल्हापूर याने द्वितीय क्रमांक मिळविला. महाराष्ट्रालाच विजयते व उपविजेतेपद मिळाल्यामुळे खेळाडूंमध्ये उत्साह होता. जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया यांच्या हस्ते विजेत्या खेळाडूंना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

अहिल्यानगर येथील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालय, एस.टी. स्टँड रोड येथे या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेचे सर्वांत मोठे आकर्षण ठरले ते चीनमधून आणण्यात आलेला अत्याधुनिक बुद्धिबळ खेळणारा रोबोट. या रोबोट ने प्रत्यक्ष खेळाडूंशी बुद्धिबळा चे डाव खेळल्याने स्पर्धेला आधुनिक तंत्रज्ञानाची अनोखी जोड मिळाली. अहिल्यानगर मध्ये प्रथमच बुद्धिबळ प्रेमींना कृत्रिम बुद्धिमत्ते वर आधारित यंत्रमानवा सोबत खेळण्याची संधी मिळाली. या रोबोट समोरही खेळाडूंनी आपले कौशल्य पणाला लावत बुद्धिमत्तेची चुरस अनुभवली. अवघ्या साडेचार वर्षांच्या बाल खेळाडू पासून ते ८७ वर्षांच्या ज्येष्ठ खेळाडू पर्यंत विविध वयो गटांतील स्पर्धकांनी सहभाग घेतल्याने स्पर्धेचे स्वरूप विशेष ठरले.

यावेळी जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया म्हणाले की, अहिल्यानगर मधून बुद्धिबळ खेळाचा प्रचार आणि प्रसार सातत्याने होत असून, दरवर्षी आयोजित होणाऱ्या स्पर्धांना खेळाडूंचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. खेळाडूंना दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने शंभरहून अधिक आंतरराष्ट्रीय दर्जाचे वूडन बुद्धिबळ बोर्ड उपलब्ध करून देण्यात आले आहेत. त्याचबरोबर चीनमधील अत्याधुनिक बुद्धिबळ रोबोट आणून खेळाडूंना आधुनिक तंत्रज्ञानाचा अनुभव देण्यात आला. भारतात शंभरहून अधिक ग्रँडमास्टर झाले असून, अहिल्यानगर मधून ही आणखी एक ग्रँडमास्टर घडविण्यासाठी जिल्हा बुद्धिबळ संघटना कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले.

स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया, उपाध्यक्ष नरेंद्र कुलकर्णी, सचिव यशवंत बापट, सुबोध ठोंबरे, शाम कांबळे, पारुनाथ ढोकळे, संजय खडके, प्रकाश गुजराथी, स्वप्निल भगुरकर, विशाल गुजराथी, दत्ता घाडगे, संजय जोशी, मनीष जसवानी, चेतन कड, विजय चोरडिया, राजीव बोधक,पंच प्रवीण ठाकरे, पवन राठी, शार्दुल तापसे, शिशिर इंदुरकर, विजय चोरडिया, प्रशांत धंगेकर, देवेंद्र ढोकळे, अनुराधा बापट, शुभदा ठोंबरे आणि रोहिणी आडकर यांनी विशेष परिश्रम घेतले.

महाराष्ट्र राज्य युवा फुटबॉल लीगसाठी फिरोदिया शिवाजियन्सचा संघ शिरपूरला रवाना

सलग तिसऱ्या वर्षी अहिल्यानगरचे प्रतिनिधित्व; पहिला सामना स्पोर्टिंग क्लब द ठाणे संघाविरुद्ध

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशन आयोजित महाराष्ट्र राज्य युवा फुटबॉल लीग २०२६-२७ स्पर्धेसाठी फिरोदिया शिवाजियन्स अकॅडमीचा १५ वर्षांखालील मुलांचा संघ नुकतेच शिरपूर (जि. धुळे) येथे रवाना होत आहे.

स्पर्धेचा पहिला टप्पा १४ ते २१ नोव्हेंबर दरम्यान होणार असून फिरोदिया शिवाजियन्सचा पहिला सामना स्पोर्टिंग क्लब द ठाणे संघाविरुद्ध होणार आहे. दोन टप्प्यांत संघ एकूण १० सामने खेळणार आहे. या स्पर्धेत महाराष्ट्रातील नामांकित फुटबॉल क्लब आणि अकॅडमी सहभागी होत आहेत.त्यामध्ये डिसोझा फुटबॉल अकॅडमी मुंबई, स्पोर्टिंग क्लब द ठाणे, डेरवण एफसी, वसई विरार युनायटेड फुटबॉल असोसिएशन, स्टेपओव्हर फुटबॉल अकॅडमी, एसव्हीकेएम स्पोर्ट्स अकॅडमी धुळे, साऊथ वेस्ट ब्ल्यू नागपूर, ध्रुव युनायटेड नाशिक आणि एसजी ५ फुटबॉल क्लब हिंगोली यांचा समावेश आहे.



विशेष म्हणजे महाराष्ट्र शासनाचा महत्त्वाकांक्षी फुटबॉल विकास प्रकल्प 'प्रोजेक्ट महादेवा' हे देखील या स्पर्धेचे प्रमुख आकर्षण असणार आहे. फिरोदिया शिवाजियन्स सलग तिसऱ्या वर्षी या प्रतिष्ठेच्या राज्यस्तरीय लीगमध्ये अहिल्यानगर जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करत आहे.

फिरोदिया शिवाजियन्स संघात हर्षद सोनावणे (कर्णधार), सम्राट आव्हाड (उपकर्णधार), शौर्य मोरे, शौर्य चंगेडिया, भार्गव साळुंखे, संकेत गव्हाणे, श्रेयांक पांडे, अर्णव सप्तर्षी, सोहम हिंगे, तनिश पडागळे, अर्णव चव्हाण, धनुष धांडे, अर्णव जोशीलकर, अभिषेक सासणे, पार्थ ताठे, अनमोल काळे यांचा समावेश आहे.संघासोबत प्रशिक्षक जेव्हिअर स्वामी आणि व्यवस्थापक व फिजिओथेरपिस्ट डॉ. प्रियदर्शिनी सूर्यवंशी असणार आहेत. या स्पर्धेसाठी संघाच्या तयारीत मुख्य प्रशिक्षक जॉर्डन फर्नांडिस तसेच क्लब कमिटी सदस्य पल्लवी सैदाणे, अभिषेक सोनवणे, राजेश अँथनी आणि सचिन पात्रे यांनी विशेष परिश्रम घेतले आहे.राज्यातील उत्कृष्ट संघांशी सामना करण्याची संधी आपल्या खेळाडूंसाठी महत्त्वाची आहे. या अनुभवातून भविष्यात आणखी चांगले फुटबॉलपटू घडतील, असा विश्वास क्लबचे सहमालक नरेंद्र फिरोदिया आणि मनोज वाळवेकर यांनी व्यक्त करुन संघाला या स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

खरवंडी कासारच्या डॉ. संकेत धुले यांचे चीनमधील वैद्यकीय शिक्षणानंतर मेडिकल इन्स्टिट्यूट परीक्षेत यश

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



पाथर्डी– पाथर्डी तालुक्यातील खरवंडी कासार येथील डॉ. संजय धुले यांचे चिरंजीव डॉ. संकेत धुले यांनी चीनमधील नॅनटॅग मेडिकल युनिव्हर्सिटी मध्ये वैद्यकीय शिक्षण पूर्ण केल्यानंतर घेतलेल्या मेडिकल इन्स्टिट्यूट (एक्झामिनेशन) परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे. डॉ. संकेत धुले यांनी चीनमध्ये वैद्यकीय शिक्षण पूर्ण करून मायदेशी परतल्यानंतर ही महत्त्वपूर्ण परीक्षा दिली होती. या परीक्षेत त्यांनी मिळवलेल्या यशामुळे धुले कुटुंबासह खरवंडी कासार गावात आनंदाचे वातावरण आहे. त्याचे आजोबा निवृत्त शिक्षक श्री रावसाहेब धुले सर यांचे लहानपनापासून संस्कार व मागदर्शन मिळाले त्यांच्या या यशाबद्दल खरवंडी कासार पंचक्रोशीतील तसेच राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रातून त्यांचे अभिनंदन करण्यात येत असून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या जात आहे.

(पान १ वरून)

भिंगार बनले बिंगोचे माहेरघर

परिसरांमध्ये या अवैध बिंगो धंद्यांनी चांगलेच बस्तान मांडले आहे. या ठिकाणी दररोज मोठ्या प्रमाणावर गर्दी होत असून, शाळकरी व महाविद्यालयीन तरुणांसह हातावर पोट असणारा कामगार वर्ग या जुगाराच्या आहारी जात आहे. यामुळे अनेकांचे संसार उद्ध्वस्त होत असून परिसरात गुन्हेगारी वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे. मध्यंतरी पोलीस तसेच स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने धडक मोहीम राबवून तोफखाना आणि कोतवाली हद्दीतील बिंगो अड्ड्यांचा बंदोबस्त करण्यात यश मिळवले, तशी कारवाई भिंगारमध्ये का होत नाही? असा संतप्त सवाल स्थानिक नागरिक विचारत आहेत. खुलेआम चालणाऱ्या या जुगाराकडे स्थानिक पोलिसांचे होत असलेले दुर्लक्ष अनेक शंकांना वाव देत आहे. त्यामुळे आता जिल्ह्याचे कर्तव्यकठोर पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनीच या गंभीर प्रकाराची तातडीने दखल घ्यावी. तसेच स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाद्वारे या भागात छापे टाकून भिंगार परिसरातील हे सर्व अवैध बिंगो अड्डे मुळासकट नष्ट करावेत, अशी मागणी त्रस्त महिला आणि नागरिकांकडून केली जात आहे.

लेखी आश्वासनानंतर उपोषण स्थगित!

कोअर कमिटी सदस्य राजेंद्र ताठे, विष्णुपंत म्हस्के, प्रकाश इवळे, संतोष हजारे, मच्छिंद्र बनकर, मनोज भुजबळ, रोहित पठारे, रमेश चिपाडे, विनायक कोके, सुरेश खरपुडे, रेणुका पुंड, संजय कानडे, अनिल निकम, राहुल रासकर, भानुदास बनकर, रोहिणी बनकर आदी उपस्थित होते. यावेळी कृती समितीचे अध्यक्ष प्रा. माणिक विधाते म्हणाले की, संपूर्ण समाजाने मोठ्या संयमाने हे आंदोलन स्थगित केले आहे. महापालिका प्रशासनाने पुतळे उभारणीचे काम प्रत्यक्ष सुरू होण्यासाठी आवश्यक कायदेशीर प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी. श्री विशाल गणपती मंदिरासमोर यापूर्वी दिलेल्या शब्दाची प्रशासनाने पूर्तता करावी. पुन्हा आंदोलन करण्याची वेळ येऊ नये, अशी आमची अपेक्षा आहे. मात्र, समाजबांधवांच्या भावना तीव्र असून आश्वासनाची पूर्तता झाली नाही, तर आंदोलन अधिक आक्रमक होईल, असा इशाराही त्यांनी दिला. तसेच आंदोलनाला पाठिंबा देणाऱ्या सर्व सामाजिक संघटना आणि समाजबांधवांचे त्यांनी आभार मानले. माळीवाडा वेशीवर महात्मा ज्योतिराव फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे भव्य पूर्णाकृती पुतळे उभारण्याच्या कामाचे भूमिपूजन २७ जुलै २०२५ रोजी करण्यात आले होते. महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या शुभहस्ते, तसेच अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते आणि आमदार संग्राम जगताप यांच्यासह अन्य मान्यवरांच्या उपस्थितीत हा भूमिपूजन सोहळा पार पडला होता. या सोहळ्यामुळे शहरातील फुलेप्रेमी आणि माळी समाजामध्ये मोठे आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. भूमिपूजनानंतर लवकरच प्रत्यक्ष कामाला सुरुवात होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात होती. मात्र, तब्बल १५ महिन्यांचा कालावधी उलटूनही कामाला सुरुवात झालेली नाही.

राज्यातील ३४ हजार न्यायालयीन कर्मचारी संपावर; न्यायालयीन कामकाज ठप्प!

उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांना लागू असलेल्या वेतनश्रेणीप्रमाणेच दुय्यम न्यायालयातील कर्मचाऱ्यांनाही सुधारित वेतनश्रेणी लागू करून वेतन देण्यात यावे, अशी कर्मचाऱ्यांची प्रमुख मागणी आहे. समान कामाच्या तत्त्वानुसार वेतनश्रेणीतील तफावत दूर करून दुय्यम न्यायालयातील कर्मचाऱ्यांना न्याय मिळावा, अशी भूमिका महासंघाने घेतली आहे. उच्च न्यायालयाच्या समितीने प्रस्तावाला मान्यता देऊन तो शासनाकडे पाठविल्यानंतरही निर्णय होत नसल्याने कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याच्या मागणीसाठी कर्मचाऱ्यांनी यापूर्वी वेळोवेळी शासनाकडे पत्रव्यवहार केला. तसेच काळ्या फिती लावून नियमित कामकाज करत निषेधही नोंदविला. मात्र, या आंदोलनांची आणि सातत्याने केलेल्या पाठपुराव्याची शासनाने दखल घेतली नसल्याने अखेर न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी बेमुदत संपाचे हत्यार उपसले आहे.दुय्यम न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या सुधारित वेतनश्रेणीसंदर्भात महाराष्ट्र शासनाने अधिकृत शासन निर्णय (जीआर) जारी केल्याशिवाय बेमुदत संप मागे घेतला जाणार नाही, अशी ठाम भूमिका महाराष्ट्र राज्य न्यायालयीन कर्मचारी महासंघाने घेतली आहे. मागणी मान्य होऊन शासन निर्णय जारी होईपर्यंत आंदोलन सुरूच ठेवण्याचा निर्धार कर्मचाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

राज्यातील सुमारे ३४ हजार न्यायालयीन कर्मचारी संपात सहभागी झाल्यामुळे न्यायालयीन कामकाजावर परिणाम होण्याची शक्यता आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील सुमारे १३०० कर्मचारी या संपात सहभागी झाल्याने जिल्ह्यातील न्यायालयीन कामकाजही प्रभावित झाले आहे. शासनाने या मागणीवर तातडीने निर्णय घेऊन कर्मचाऱ्यांना दिलासा द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

याबाबतची माहिती अहमदनगर जिल्हा न्यायालयीन कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष अंकुश सांगळे, कार्याध्यक्ष शिरीष ढाळे, सचिव रवींद्र सूर्यपुजारी, उपाध्यक्ष अतुल खरपुडे यांनी दिले यावेळी, प्रबंधक संदीप कडू, अविनाश लिपाने, अधीक्षक डी बी शिंदे, बी एम गुंजाळ, डी बी काकडे, अरुण शिंदे, आनंद सोनपसारे संगीता कोल्हे, सविता भालेराव, वैशाली बुऱ्हाडे, स्वाती क्षीरसागर, दादाभाऊ आंधळे, कुमुदिनी गायकवाड, बी डी शिंदे, ग्रीष्मा सोनसळे, श्रीपाद माचवे,रवींद्र घोडके, गणेश सब्बन, संतोष लयचेट्टी, सतिश ढवळे, उद्धव नरवडे, युवराज गुंजाळ, दिपक दुसुंगे व सर्व न्यायालयीन कर्मचारी तसेच सेवानिवृत्त कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष हेमंत जोशी, अविनाश नगरकर, दयानंद अन्नदाते व इतर सेवानिवृत्त कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते

संगमनेरमध्ये अवैध कत्तलखान्यावर छाप्यात चौदाशे किलो गोमांस जप्त

आहे. या माहितीच्या आधारे पोलिसांनी पंचांसमक्ष घटनास्थळी अचानक छापा टाकला. मात्र, पोलिसांची चाहूल लागताच कत्तल करणारे आरोपी घटनास्थळावरून पसार झाले.

पोलिसांनी शेडची झडती घेतली असता तेथे गोवंशीय जनावरांची कत्तल केल्याचे उघडकीस आले. या कारवाईत पोलिसांनी ४ लाख २० हजार रुपये किमतीचे १४०० किलो गोमांस, ७०० रुपये किमतीचे तीन चाकू व दोन लोखंडी कुऱ्हाडी आणि २ हजार रुपये किमतीचा एक इलेक्ट्रिक काटा असा एकूण ४ लाख २२ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

याप्रकरणी संगमनेर शहर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २७१, ३२५ सह महाराष्ट्र पशुसंरक्षण अधिनियम १९९५ (सुधारित २०१५) चे कलम ५ (ब) (क), ९ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून, फरार आरोपींचा शोध सुरू आहे. गुन्ह्याचा पुढील तपास संगमनेर शहर पोलीस करत आहेत.

महापालिकेच्या न्यायालयीन विभागाचे काम म्हणजे 'आंधळं दळतंय अन् कुत्रं पीठ खातंय'; सभापती लोंढेंचा संताप!

विभागाच्या कामकाजाचा सविस्तर अहवाल पुढील सभेत सादर करण्याचे निर्देश दिले. तसेच पाण्याची नासाडी करणाऱ्यांना चार हजार रुपयांचा दंड आणि त्यानंतरही सुधारणा न झाल्यास फौजदारी गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले.

महापालिकेच्या स्थायी समितीची सभा सभापती पै. सुभाष लोंढे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी उपायुक्त मेहर लहारे, सदस्य तथा माजी महापौर बाबासाहेब वाकळे, नगरसेवक निखिल वारे, मनोज कोतकर, मनोज दुलम, नवनाथ कातोरे, नगरसेविका संध्याताई पवार यांच्यासह अन्य सदस्य उपस्थित होते. सभेच्या सुरुवातीलाच नगरसेवक निखिल वारे यांनी महापालिकेच्या न्यायालयीन विभागाच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. माळीवाडा येथे महात्मा ज्योतिबा फुले व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्याच्या कामाला न्यायालयाने स्थगिती दिली आहे. तसेच महापालिकेच्या प्रारूप विकास आराखड्यालाही उच्च न्यायालयाने स्थगिती दिली आहे. या दोन्ही महत्त्वाच्या प्रकरणांमध्ये महापालिकेची बाजू सक्षमपणे मांडण्यासाठी न्यायालयीन विभागाने काय प्रयत्न केले, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. पुतळा उभारणीच्या विरोधात काही लोक न्यायालयात जाणार असल्याची शक्यता आधीपासूनच होती. अशा परिस्थितीत महापालिकेने उच्च न्यायालयात कॅव्हेट दाखल करणे आवश्यक होते. मात्र, याबाबत प्रशासनाने तत्परता दाखवली नाही. परिणामी पुतळा उभारणीच्या कामाला स्थगिती मिळाली. प्रारूप विकास आराखड्याच्या बाबतीतही अशीच परिस्थिती निर्माण झाली आहे. महापालिका वकिलांवर लाखो रुपये खर्च करते, तरी न्यायालयात सक्षमपणे बाजू मांडली जात नसेल तर या विभागाचे नेमके काम काय, असा सवाल वारे यांनी केला. यावेळी त्यांनी न्यायालयीन विभागाचे अधिकारी आणि महापालिकेच्या पॅनलवरील वकील सभेला उपस्थित राहत नाहीत, याबाबतही नाराजी व्यक्त केली. संबंधित अधिकारी व वकील सभेला उपस्थित राहिल्याशिवाय सभा सुरू करू नये, अशी भूमिका त्यांनी घेतली. माजी महापौर बाबासाहेब वाकळे आणि नगरसेवक सुरेश बनसोडे यांनीही न्यायालयीन विभागाच्या कामकाजावर ताशेरे ओढले. महापालिकेचे किती खटले न्यायालयात प्रलंबित आहेत, किती निकाली निघाले आहेत आणि पॅनलवरील वकिलांना किती मानधन दिले जाते, याची माहिती सभापती लोंढे यांनी मागितली. मात्र, याबाबत न्यायालयीन विभागाचे अधिकारी समाधानकारक उत्तर देऊ शकले नाहीत. यावर सभापती पै. सुभाष लोंढे यांनी तीव्र नाराजी व्यक्त करत महापालिकेत प्रभारी राज सुरू असल्याचे सांगितले. कोणता अधिकारी नेमके काय काम करतो, याची माहितीही प्रशासनाला नसल्याचे चित्र आहे. कामात हलगर्जीपणा करणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी, असे निर्देश त्यांनी दिले. न्यायालयीन विभागाचे कामकाज म्हणजे 'आंधळं दळतंय अन् कुत्रं पीठ खातंय' अशी परिस्थिती झाली असल्याची खंत व्यक्त करत पुढील सभेत सर्व प्रकरणांचा सविस्तर अहवाल सादर करण्याचे आदेश त्यांनी दिले. शहरात मोठ्या प्रमाणात पाण्याची नासाडी होत असल्याचा मुद्दा सभेत उपस्थित करण्यात आला. धरणात मुबलक पाणी उपलब्ध असले तरी शहरात पाणी साठवण्याची क्षमता मर्यादित आहे. त्यामुळे उपलब्ध पाण्याचे योग्य नियोजन करणे आवश्यक आहे. फ्शहरात भरदिवसा चोऱ्यांचे प्रमाण वाढत असल्याचा मुद्दा नगरसेवक मनोज कोतकर यांनी उपस्थित केला. नगरसेविका संध्याताई पवार यांच्या घरीही भरदिवसा चोरी झाल्याची घटना घडली आहे. शहरातील वाढत्या चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी महापालिकेच्या माध्यमातून प्रमुख चौकांसह विविध ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात यावेत. यामुळे पोलिसांना चोरट्यांचा शोध घेण्यास मदत होईल, असे त्यांनी सांगितले. यावर सभापती लोंढे यांनी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि आमदार संग्राम जगताप यांना निवेदन देऊन आवश्यक निधी उपलब्ध करून घेण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असे सांगितले. माळीवाडा वेशीजवळ मोठ्या प्रमाणात विद्रूपीकरण होत असल्याचा मुद्दा नगरसेवक निखिल वारे यांनी उपस्थित केला. माळीवाडा वेस नेमकी कोणाच्या मालकीची आहे, महापालिकेच्या मालकीची असल्यास तिची स्वच्छता आणि देखभाल करण्याची जबाबदारी प्रशासनाची आहे. मात्र, ऐतिहासिक वास्तूचे सर्वत्र विद्रूपीकरण होत असल्याने प्रशासनाने याकडे लक्ष द्यावे, अशी मागणी त्यांनी केली. यावर संबंधित विभागाकडून समाधानकारक उत्तर मिळाले नाही. शहराचे विद्रूपीकरण करणाऱ्यांविरोधात यापुढे फौजदारी कारवाई करण्यात यावी, अशा सूचना अधिकाऱ्यांना देण्यात आल्या. महात्मा ज्योतिबा फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचा पुतळा तयार करण्याचे काम संबंधित एजन्सीला देण्यात आले आहे. एजन्सीने पुतळा तयार करून ठेवला असतानाही महापालिकेकडून अद्याप त्याचे बिल अदा करण्यात आलेले नाही. वेळेत बिल न दिल्यास संबंधित एजन्सी हा पुतळा अन्यत्र विकू शकते. महापालिकेच्या नाकर्तेपणामुळे अशी परिस्थिती निर्माण झाली असल्याची खंत नगरसेवक निखिल वारे यांनी व्यक्त केली. महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत शहरातील प्रत्येक घरासाठी क्यूआर कोड देण्यात आले आहेत. घंटागाडीचे लोकेशन तपासणे तसेच कचरा संकलनासंदर्भातील तक्रारी नोंदविणे यासाठी या प्रणालीचा वापर अपेक्षित आहे. मात्र, प्रत्यक्षात नागरिकांकडून या क्यूआर कोडचे स्कॅनिंग होत नसल्याचा मुद्दा नगरसेवक निखिल वारे यांनी उपस्थित केला. या प्रणालीवर दरमहा साधारण दीड लाख रुपये खर्च केले जात असताना त्याचा प्रत्यक्ष उपयोग किती होतो, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. या संपूर्ण प्रक्रियेत मोठा घोटाळा झाल्याची शंकाही त्यांनी व्यक्त केली. त्यामुळे या यंत्रणेच्या कामकाजाची चौकशी करून खर्च आणि प्रत्यक्ष वापराचा तपशील तपासण्याची गरज व्यक्त करण्यात आली. महापालिकेच्या वतीने प्रोफेसर कॉलेज चौक परिसरात नाट्यसंकुलाची उभारणी करण्यात येत आहे. या प्रकल्पाचे सुमारे ९५ टक्के काम पूर्ण झाले असून इंटेरियर डिझाइनचे काम बाकी आहे. सर्व नगरसेवक नाट्यसंकुलाची पाहणी करणार असल्याचे सभापती पै. सुभाष लोंढे यांनी सांगितले. सभेत खाजगी टँकरद्वारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासंदर्भातील प्राप्त दरांच्या निविदांना मंजुरी देण्याचा विषय तसेच मोकाट कुत्र्यांच्या निवारागृहासंदर्भातील विषय स्थगित ठेवण्यात आले. या दोन्ही विषयांवर सविस्तर चर्चा करून पुढील निर्णय घेतला जाणार आहे. उर्वरित विषयांना स्थायी समितीने मंजुरी दिली.